# कार्यालय पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वर्धा
मुख्य बि.एस.एन.एल. ऑफीस समोर, सिव्हील लाईन, वर्धा
दुरध्वनी क्र. ०७१५२-२४३८४४ ई.मेल acbwardha@gmail.com


## प्रेस नोट

दिनांक २५.०२.२०२६

तक्रारदार यांचे वादांकीत शेतजमीनीच्या केस मधील संबंधीत व्यक्तींना नोटीस तसेच तक्रारदार यांच्या बाजुने आदेश पारीत करण्याकरीता तक्रारदारास १०,००० रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना आलोसे यांनी तडजोडी अंती ७,०००/- रुपये लाच रकमेची मागणी करून पंचासमक्ष लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात मिळुन आले.

| | |
|---|---|
| आलोसे यांचे नाव | श्रीमती विद्या ज्ञानेश्वरराव लोखंडे, वय ५५ वर्षे, पद - महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय समुद्रपुर, रा. आदर्श नगर कलोडे दुधडेअरी जवळ, हिंगणघाट तह. हिंगणघाट जि.वर्धा |
| गुन्हा घटना ता.वेळ व ठिकाण | दिनांक २३.०२.२०२६ चे १०.३० वा. ते ते दिनांक २५.०२.२०२६ चे १४.१९ वा. दरम्यान मौजा तहसिल कार्यालय, समुद्रपुर जि.वर्धा आलोसे यांचे कक्षात |
| लाचेची रक्कम | मागणी १००००/-रू. तडजोडीअंती ७,०००/-रू.स्विकारले. |

हकिकत याप्रमाणे आहे की, तक्रारदार यांचे मौजा लोणार तह.समुद्रपुर, जि.वर्धा येथील शेत सर्वे नं.८७ आराजी २.०० हे.आर. हे शेत तक्रारदार यांचे भासरे यांनी परस्पर नागपुर येथील रामटेके यांना विकल्याचे माहित पडल्याने शेतजमिनीचा फेरफार रोखण्याकरीता तक्रारदार यांनी तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे आक्षेप नोंदविण्या करीता अर्ज दिला होता. सदर अर्जावर तक्रारदार यांनी तहसिलदार समुद्रपुर यांना त्यांचे वकीलामार्फत आपले म्हणने सादर केले होते. तक्रारदार यांचे वादांकीत शेतजमीनीच्या केस मधील संबंधीत व्यक्तींना नोटीस तसेच तक्रारदार यांना त्यांचे बाजुने आदेश पारीत करण्याकरीता आलोसे यांनी १०,००० रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार हिला लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने तक्रारदार हिने दि. २३.०२.२०२६ रोजी ला.प्र.वि. कार्या. वर्धा येथे आपली लेखी तक्रार दिली असता दि.२३.०२.२०२६ रोजी व दि. २५.०२.२०२६ रोजी लाच मागणी व लाचसापळा कार्यवाही केली असता. आलोसे यांनी तडजोडी अंती ७,०००/- रुपये लाच रक्कम पंचा समक्ष स्विकारतांना मिळुन आले.

श्रीमती विद्या ज्ञानेश्वरराव लोखंडे, वय ५५ वर्षे, पद - महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय समुद्रपुर, वर्ग-३, रा. आदर्श नगर कलोडे दुधडेअरी जवळ, हिंगणघाट तह. हिंगणघाट जि.वर्धा यांचेवर पोलीस स्टेशन समुद्रपुर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री. दिगांबर प्रधान, पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर श्रीमती माधुरी बाविस्कर, अप्पर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर यांचे मार्गदर्शनात पर्यवेक्षक अधिकारी राकेश साखरकर, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि. वर्धा, सापळा अधिकारी श्रीमती कान्होपात्रा बन्सा, पोलीस निरिक्षक, श्री. संदिप मुपडे, ला.प्र.वि. वर्धा व पथकातील स.फौ. मंगेश गंधे, पो.हवा. पंकज डाहाके, सचिन गाढवे, मपो.हवा. राखी फुलमाळी, पो.कॉ. प्रशांत मानमोडे, मनिष मसराम, प्रितम इंगळे, लक्ष्मण केंद्रे, विष्णु काळुसे, विनोद धोंगडे, म.पो.अं. अश्विनी भानखेडे व चालक स.फौ. गणेश मेश्राम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ला.प्र.वि. वर्धा यांनी केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा कडुन आव्हान करण्यात येते की, कोणी लोकसेवक स्वत: अगर इतरांमार्फत शासकिय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास टोल फ्रि क्रमांक १०६४, दुरध्वनी क्र. ०७१५२-२४३८४४ व व्हॉटस ॲप मोबाईल क्र. ७५१७६११०६४ व पोलीस उपअधिक्षक, मो.क्र.७३५०९०२१०० वर संपर्क करावा. तसेच आमचे ई.मेल acbwardha@gmail.com वर तक्रार करावी.

Dy. Supdt. Anti-Corruption Bureau WARDHA

(राकेश साखरकर)
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वर्धा

CamScanner